# मिरा भाईंदर महानगरपालिका

## सामान्य प्रशासन विभाग

मुख्यालय, पहिला मजला, स्व. इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर

(प.) दूरध्वनी क्र.022-28192828 ई-मेल आयडी gad@mbmc.gov.in


जा. क्र. मनपा/सा.प्र./३५५/२०२६-२७ दि.११/०९/२०२६

## // आदेश //

**विषय :- गणेशोत्सव व गणेश विसर्जन सुस्थितीत व चांगल्यारितीने पार पाडणेबाबत.**

**संदर्भ :- जा.क्र.मनपा/साबां/विद्युत/शा.अ.-३/४२४८/२०२६-२७ यांचे दि.०९/०९/२०२६ रोजीचे पत्र.**

मिरा भाईंदर महानगरपालिका शहरामध्ये दि.१४/०९/२०२६ ते दि. २५/०९/२०२६ या कालावधीत श्री गणेशोत्सव साजरा होणार आहे. खालील दिवशी श्री गणेश मुर्तीचे विसर्जन होणार आहे.

१) दि. १५/०९/२०२६ (दिड दिवस)

२) दि. १६/०९/२०२६ (अडीच दिवस)

३) दि. १८/०९/२०२६ (पाच दिवस)

४) दि. १९/०९/२०२६ (सहा दिवस गौरी विसर्जन)

५) दि. २०/०९/२०२६ (सात दिवस)

६) दि. २५/०९/२०२६ (अनंत चतुर्दशी)

वरिलप्रमाणे विसर्जनाच्या दिवशी गणेश विसर्जन सुस्थितीत व चांगल्या रितीने पार पाडणेकरिता खालीलप्रमाणे अधिकारी यांना कामाचे वाटप करण्यात येत आहे.

| अ.क्र | अधिकाऱ्याचे नाव | सोपविण्यात आलेल्या कामाचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | मुख्य अग्निशमन अधिकारी, अग्निशमन विभाग | श्री गणेश विसर्जन स्थळी आपल्या अग्निशमन दलाच्या अधिकारी व कर्मचाऱ्याची यांची नेमणूक करुन आवश्यक त्या लाईफ जॅकेट, इमर्जन्सी लाईट इत्यादी साहित्यासह विसर्जन पुर्ण होईपर्यंत विसर्जन ठिकाणी उपस्थित राहणे करीता आदेशित करावे. |
| २. | जनसंपर्क अधिकारी जनसंपर्क विभाग | नैसर्गिक व कृत्रिम तलावे यांची यादी व्यापक प्रमाणात प्रसिध्द करण्यात यावी. |

Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| ३. | कार्यकारी अभियंता,<br>पाणी पुरवठा व मलनि:सारण विभाग | विसर्जन स्थळी आवश्यक त्या ठिकाणी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, टँकर पुरवठा तसेच पिण्याच्या पाण्याची वाटप व्यवस्थेकरिता आपल्या विभागातील कर्मचाऱ्यांच्या नेमणुका करण्यात याव्यात. |
| ४. | विभाग प्रमुख,<br>भांडार विभाग | नैसर्गिक तलावे व कृत्रिम तलावे येथे बॅनर प्रदर्शित करणेकरिता ते छपाई करुन सर्व प्रभाग समितीचे सहा.आयुक्त यांचेकडे उपलब्ध करुन देण्यात यावे. |
| ५. | सिस्टीम ॲनालिस्ट<br>ई-टेंडरींग विभाग | श्री गणेश विसर्जन स्थळी सी सी टिव्ही कॅमेरेचे नियोजन करण्यात यावे. |

सदर कामाचे तंतोतंत पालन करण्यात यावे तसेच सदर कामात हलगर्जीपणा होणार नाही याची दक्षता घ्यावी.

**सोबत:- विसर्जन स्थळांची यादी जोडण्यात येत आहे.**

**(डॉ. सचिन बांगर)**
**उपायुक्त (मु.)**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**

**प्रत माहितीस्तव :-**
**१) मा.आयुक्त महोदय, मि.भा.मनपा**
**२) मा. अति.आयुक्त (१ व २) मि.भा.मनपा**

**प्रत कार्यवाहीस्तव :-**
**संबंधित अधिकारी / कर्मचारी**

Scanned with OKEN Scanner